नियंत्रीत साखरेच्या लेख्यानुसार देय होणाऱ्या भावफरकाच्या रकमेचे १००% प्रदान जिल्हास्तरावरुन करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## शासन निर्णय क्रमांकः साखर-२५१३/प्र.क्र. ४५/ना.पु.१९.

मादाम कामा मार्ग, महात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २६ मार्च, २०१३.

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांकः **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक -साखर-२५१०/प्र.क्र.७३/नापु.१९, दिनांक २ जून, २०१०.**

२) शासन निर्णय क्रमांकः **साखर-१७१०/प्र.क्र.१३७/ना.पु.१९, दि.२३ सप्टेंबर,२०१०.**

३) **शासन शुध्दीपत्रक, क्रमांक -साखर-२५१०/प्र.क्र.७३/ना.पु.१९, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२.**

**प्रस्तावना**

साखर नॉमिनींना सहाय्य करण्याच्या दृष्टीने नियंत्रीत साखरेच्या खरेदी/ विक्री दराच्या फरकाची ९०% रक्कम जिल्हा स्तरावरुन अदा करण्याचा निर्णय दिनांक २३ सप्टेंबर,२०१० व दिनांक २३ फेब्रुवारी,२०१२ अन्वये घेण्यात आला होता. तथापि, शासनाकडून वेळोवेळी सूचना निर्गमित करुनही नियंत्रीत साखरेच्या व्यवहारापोटी येणे/ देणे असलेल्या रकमांचे विहित नमुन्यातील अचूक असे लेखे विहित कालावधीत वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयास प्राप्त होत नाहीत. परिणामी, साखर नॉमिनींना वेळेवर रकमा मिळत नसल्याने त्यांनी केलेल्या गुंतवणुकीच्या रकमा प्रलंबित राहतात. याकरीता साखर नॉमिनींना साखर भाव फरकाच्या रकमा त्वरित मिळाव्यात याकरीता उपाययोजना करावयाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय**

साखर नॉमिनींना भाव फरकाच्या रकमा अदा करण्यासाठी दिनांक २३ सप्टेंबर, २०१० च्या व दिनांक २३ फेब्रुवारी,२०१२ च्या शासन शुध्दीपत्रकात दिलेल्या प्रचलित असलेल्या पध्दतीनुसार कार्यवाही करावयाची आहे. परंतु, यापुढे साखर नॉमिनींना साखर भाव फरकाच्या देय रकमेचे १००% प्रदान जिल्हा स्तरावरुनच करावयाचे आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) नॉमिनीने नियंत्रीत साखर खरेदी केल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी यांना संपूर्ण बीले सादर करावीत. सदर देयकानुसार नियंत्रीत साखर रास्त भाव

दुकानापर्यंत पोहचल्याची खात्री केल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी नियंत्रीत साखरेची खरेदी किंमत व रास्त भाव दुकानदाराने साखर नॉमिनीकडे जमा केलेली रक्कम यामधील फरकाच्या तसेच वाहतूक खर्च इत्यादी रकमेपैकी सुमारे ९०% रक्कम नॉमिनीकडून एक बॉड करुन घेऊन पी.एल.ए. मधून अदा करावी.

२) उर्वरित १०% रक्कम नॉमिनींना प्रदान करताना जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी मासिक नियतन, केंद्र शासनाचे विभागनिहाय व उत्पादन वर्षनिहाय मंजूर दर, रस्त्याने केलेल्या वाहतूकीची अंतरे प्रमाणित केल्यानुसार प्रत्यक्ष खर्च, मार्जिन इत्यादी बाबींची पडताळणी काटेकोरपणे करुन अदाई करावी.

३) या प्रकरणी अति प्रदान किंवा चुकीचे प्रदान झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी व जिल्हाधिकारी यांची राहिल.

४) उपरोक्त प्रमाणे १००% प्रदान केल्यावर त्यानुसार विहित नमुन्यात मासिक लेखा वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयास पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत सादर करावेत. तद्नंतरच पडताळणीअंती भावफरक, वाहतूक खर्च, मार्जिन इत्यादी देय रकमा जिल्हा पुरवठा अधिकारी यांना देण्यात येतील.

२. यासाठी होणारा खर्च जिल्हाधिकारी यांच्या पीएलए मधून मुख्य लेखाशिर्ष ४४०८- अन्न साठवण व वखार साठवण (१०१) प्रापण व पुरवठा (०२)(०१) मुंबई शहर (४४०८ ००७७) व जिल्हा पुरवठा कार्यालयांनी (०२)(०२) मुफसल दत्तमत (४४०८ ००९५) याखाली उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीमधून खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर कार्यपध्दती दिनांक ०१ एप्रिल, २०१३ पासून अंमलात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०३२६१६१९३८७२०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Eknath Kashinath Gagare

Digitally signed by Eknath Kashinath Gagare
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Food Civil Supplies & Consumer Protection, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Eknath Kashinath Gagare
Date: 2013.03.30 15:53:52 +05'30'

(ए.का. गागरे)
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव

२. मा. मुख्यमंत्र्याचे सचिव
३. मा. उप मुख्यमंत्र्याचे सचिव
४. मुख्य सचिव
५. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
९. सर्व जिल्हाधिकारी/ सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी
१०. सर्व उप आयुक्त (पुरवठा).
११. संचालक नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
१२. उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा) पुरवठा भवन, परेल, मुंबई.
१३. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी.
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. वित्तीय सल्लागार व उप सचिव,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१७. महालेखापाल- १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१८. महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२०. वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती (ना.पु.१९).